ePaper

महाविकास आघाडीतील खदखद चव्हाट्यावर?

वर्ष - 6 । अंक - 352 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- आयुक्तसाहेब आता 'ऑनफिल्ड' उतरा, जनतेच्या समस्या जाणून घ्या'
- 'आरटीओ'च्या वायुवेग पथकाचा कारवाईचा दंडुका!
- पवारकाका सांगा कुणाचे?


www.mahaenews.com | बुधवार , दि. 12 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# उद्योग नव्हे; गुन्हेगारनगरी!

## » वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे पिंपरी-चिंचवड शहर बनले असुरक्षित

।पिंपरी । ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयुक्तालयाच्या स्थापनेनंतर काही काळ गुन्हेगारांवर वचक बसविण्यात पोलिस यशस्वी झाले होते. मात्र, त्यानंतर पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिती निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांत पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या गुन्हेगारीने कहर केल्याने शहर असुरक्षित बनले आहे. जानेवारी ते मार्च या अवघ्या तीन महिन्यांत शहरात १४ खून झाले असून, ६९ बलात्काराचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. याशिवाय लूटमारीच्या ९३ आणि दंग्यांच्या ४० घटना घडल्या आहेत. शहरातील वाढत्या गुन्हेगारीमुळे शहरवासीयांमध्ये भीतीचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

गेल्या काही दिवसांत शहरात खुलेआम खून, खुनाचा प्रयत्न, कोयत्याने वार, सार्वजनिक ठिकाणी शस्त्रांद्वारे दहशत पसरवणे, भर रस्त्यात अडवून लुटणे, महिलांची छेडछाड या प्रकारांमध्ये वाढ झाली आहे. या सर्व घटनांमुळे पोलिस यंत्रणेच्या कामावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.





पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकरणाचा वाढता आलेख पाहता येथील कायदा सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी चार वर्षांपूर्वी स्वतंत्र पोलिस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. शहरातील गुन्हेगारी कमी करणे, गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणे, शहरातील नागरिकांना सुरक्षित आणि भयमुक्त वातवरण निर्माण करून देणे, हा आयुक्तालयामागील मुख्य उद्देश होता.



### तोडफोडीमुळे दहशत

शहर आणि परिसरात वाहन तोडफोडीच्या घटना ही पोलिसांची नेहमीचीच डोकेदुखी ठरली आहे. मागील काळात या घटना रोखण्यात पोलिसांना यश आले होते. मात्र, दरम्यानच्या काळात तोडफोडीच्या घटनांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. भोसरी, वाकड आणि चिखली परिसरात नुकतीच वाहनांची तोडफोड झाली आहे. त्यामुळे नागरिक पुन्हा दहशतीखाली आल्याचे चित्र आहे.

### प्रतिबंधासाठी प्रयत्नांचा अभाव

चिखली येथे अल्पवयीन मुलीवर बावीस वार करून खून करणारे दोन्ही अल्पवयीन आरोपी पोलिस रेकॉर्डवरील आहेत. शहरातील अनेक गुन्हेगार तुरुंगातून सुटून आल्यानंतर पुन्हा गुन्हे करतात. पोलिस अशा गुन्हेगारांना अटक करून स्वतःची पाठ थोपटून घेतात. मात्र, अशा प्रकारचे गुन्हे घडू नये, यासाठी पोलिस यंत्रणा काम करताना दिसत नाही.

| चालू वर्षातील गुन्हेगारीचा आढावा (जानेवारी ते मार्च २०२३) | |
|---|---|
| खून | १४ |
| खुनाचा प्रयत्न | २२ |
| बलात्कार | ६९ |
| लूटमार | ९३ |
| दंगा | ४० |
| विनयभंग | १२५ |

| गेल्या वर्षभरातील गुन्हेगारीच्या घटना | |
|---|---|
| खून | ८० |
| खुनाचा प्रयत्न | ११५ |
| बलात्कार | २४३ |
| लूटमार | ४६१ |
| दंगा | १७३ |
| विनयभंग | ४४२ |

| वर्ष 2021 मधील गुन्हेगारीच्या घटना | |
|---|---|
| खून | ८५ |
| खुनाचा प्रयत्न | १२२ |
| बलात्कार | १७१ |
| लूटमार | २७२ |
| दंगा | १६९ |
| विनयभंग | ३५१ |

### भरदिवसा सरपंचाचा खून

» काही दिवसांपूर्वीच सरपंच प्रवीण गोपाळे यांचा प्रतिशिर्डी म्हणून प्रसिद्ध असलेल्या शिरगाव येथील साई मंदिरासमोर खून करण्यात आला. भर वर्दळीच्या ठिकाणी हा खून झाल्याने दहशत पसरली आहे. चिंचवड येथे कर्तव्य बजावत असलेल्या वाहतूक पोलिसाचा अंगावर कार घालून खून करण्याचा प्रयत्न करण्यात आला. फुगेवाडी येथेही कर्तव्य बजावत असलेल्या महिला पोलिसाचा टवाळखोरांनी विनयभंग केला. याशिवाय लूटमार, कोयत्याने वार, दोन गटांत भांडणे आणि वाहनांची तोडफोड असे प्रकार सुरूच आहेत.



### नाकाबंदीला केराची टोपली

»पायी, सायकल, वाहन गस्त; तसेच नाकाबंदीमुळे पोलिसांचा समाजात वावर दिसून येतो. त्यामुळे गुन्हेगारांवर दबाव राहतो. या पार्श्वभूमीवर हद्दीमध्ये अचानक नाकाबंदी करण्याबाबत यापूर्वी वरिष्ठांकडून आदेश देण्यात आले होते. मात्र, स्थानिक पोलिसांनी या आदेशाला केराची टोपली दाखविल्याचे चित्र आहे.



# जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी आयुक्तसाहेब आता 'ऑनफिल्ड' उतरा!

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विशाल काळभोर यांची मागणी

। पिंपरी चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।





**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्यामुळे गेल्या वर्षभरापासून प्रशासकीय (PCMC) राजवट सुरू आहे. त्यामुळे आयुक्त शेखर सिंह हेच प्रशासक म्हणून गेल्या नऊ महिन्यांपासून कामकाज पाहत आहे. आयुक्त सिंह यांनी महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी चांगले प्रयत्न केले आहेत, त्याबद्दल त्यांचे कौतूक आहे. मात्र, नगरसेवक नसल्याने आयुक्त सिंह यांच्यावर जास्त जबाबदारी आहे, त्यामुळे त्यांनी आता बैठका, मिटींग सोडून कार्यालयाबाहेर पडून 'ऑनफिल्ड' उतरून जनतेच्या समस्या जाणून घ्याव्यात. तसेच शहरातील रखडलेली विकास कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विशाल बाळासाहेब काळभोर यांनी केली आहे.**

याबाबत विशाल काळभोर यांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, 12 मार्च 2022 रोजी महापालिकेतील नगरसेवकांचा कार्यकाळ संपला. त्यानंतर राज्य सरकारने तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली. त्यानंतर 18 ऑगस्ट रोजी सातार्‍याचे जिल्हाधिकारी शेखर सिंह यांची महापालिका आयुक्त तथा प्रशासक म्हणून नियुक्ती केली. सिंह यांना महापालिकेत येऊन 18 एप्रिलला 8 महिने पूर्ण होतील. त्यांनी पालिकेत आल्यानंतर कर वसुलीसाठी विविध प्रयत्न केले, त्यामुळेच पालिकेच्या इतिहासात प्रथमच कर संकलन व कर आकारणी विभागाला 817 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. यासह पालिकेला इतर विभागातून चांगले उत्पन्न मिळाले आहे. याबद्दल आयुक्त सिंह यांचे कौतूक आहे.

### ऑनफिल्ड उतरावे, शहर समजून घ्यावे...

» महापालिकेत नगरसेवक असताना प्रभागातील नागरिकांच्या तक्रारी, समस्या नगरसेवक सोडवत असतात. मात्र, नगरसेवक नसल्याने आयुक्त तथा प्रशासक सिंह यांच्यावर सध्या मोठी जबाबदारी आहे. त्यांनी विविध कामासाठी महापालिकेत येणाऱ्या (PCMC) नागरिकांना भेटीसाठी वेळ देणे गरजेचे आहे. तसेच सिंह हे शहरात आल्यापासून त्यांनी शहर फिरून पाहिले नाही. त्यामुळे त्यांनी आता बैठकांमधून थोडा वेळ काढून 'ऑनफिल्ड उतरावे, शहर समजून घ्यावे, जनतेत मिसळावे. त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा काळभोर यांनी व्यक्त केली आहे.

---

# पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।



एल निनोच्या प्रभावामुळे जून जुलै महिन्यात पावसाचे प्रमाण कमी असण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम धरण साठ्यावर होणार आहे. त्यामुळे पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमधील पाण्याचा वापर काटकसरीने करा, पर्यायी जलस्त्रोतांची व्यवस्था याचा कृती आराखडा राज्य शासनाला सादर करण्याच्या सूचना राज्य शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, खडकवासला धरण प्रकल्पात सध्या १३.१० टीएमसी पाणीसाठा शिल्लक असून, त्यापैकी महापालिकेला ऑगस्ट अखेर पर्यंत ७.९० टीएमसी पाणी लागणार आहे. बाष्फीभवन, सिंचन याचा विचार करता धरणात पुरेसा पाणी साठा नसले तर पुणेकरांवर पाणी कपातीची टांगती तलवार असणार आहे.

राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी आज राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा, धरणातील पाणी साठ्याचे नियोजन यासंदर्भात ऑनलाइन बैठक घेतली. त्यामध्ये महापालिकेचे अधिकारीही सहभागी झाले. या बैठकीत मॉन्सूनच्या प्रवासात 'एल निनो'चा अडथळा निर्माण होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# 'हम करे सो कायदा' चालणार नाही'

## पालकमंत्र्यांचा वेताळ टेकडी रस्ता विरोधकांना टोला

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।




**बालभारती ते पौड फाटा दरम्यानच्या नियोजित रस्त्याला विरोध करणाऱ्यांचे मत आणि म्हणणे विचारात घेऊन त्यावर मार्ग काढून विकास कामे करावी लागतील. मात्र, 'हम करे सो कायदा', असे चालणार नाही, अशा शब्दांत जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रस्ता नकोच, अशी भूमिका घेणाऱ्यांना टोला लगावला.**

प्रस्तावित बालभारती ते पौड फाटा रस्त्यावरून पर्यावरणवादी आणि महापालिका यांच्यात मतमतांतरे आहेत. वेताळ टेकडीवरून हा रस्ता जात आहे. त्यामुळे टेकडी धोक्यात येईल, असे काही संस्थांचे म्हणणे आहे. याविरोधात पर्यावरणवादी संस्थांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. बांधकाम व्यावसायिकांच्या फायद्यासाठी रस्ता तयार करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या रस्त्याला पर्यावरण प्रेमी नागरिकांचा विरोध वाढत असताना भाजपाच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी यांनीही नागरिकांना पाठिंबा देत हा प्रकल्प होऊ देणार नाही, असे जाहीर केले आहे.

या पार्श्वभूमीवर पालकमंत्री पाटील यांना विचारले असता ते म्हणाले, की प्रशासन हे त्यांच्या नियोजनानुसार काम करते. पण लोकांच्या भावनांचा आदर करण्यासाठी पर्यावरणवादी नागरिकांशी संवाद साधणार आहे. लोकशाहीत 'हम करे सो कायदा' चालत नाही. सन १९८७ पासून हा विषय चर्चेत आहे, त्यामुळे डोक्यावर आभाळ पडले आहे. या पद्धतीने त्याची लगेच निविदा काढली पाहिजे, असे काही नाही.

### रस्त्याला शिवसेनेचाही विरोध

» कोथरूडला जाण्यासाठी रस्ता हवा, अशी आमचीही मागणी आहे. मात्र, वेताळ टेकडी फोडून आणि पर्यावरणाचा ऱ्हास करून, पुणेकरांचे नुकसान होणार असल्याने आमचा या नियोजित रस्त्याला विरोध आहे. त्यामुळे वेताळ टेकडी बचाव कृती समितीच्या वतीने १५ एप्रिल रोजी करण्यात येणाऱ्या जनजागृती अभियानात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सहभागी होणार असल्याचे महापालिकेतील या पक्षाचे गटनेते पृथ्वीराज सुतार यांनी स्पष्ट केले.



# ‘आरटीओ’च्या वायुवेग पथकाचा कारवाईचा दंडुका !

## 7 हजार वाहनांवर कारवाई, 17 हजार वाहनांची तपासणी, 11 हजार जणांचे समुपदेशन

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) वतीने पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर विशेष मोहीम राबवली जात आहे. वायुवेग पथकाकडून एक डिसेंबर २०२२ ते ३१ मार्च २०२३ या चार महिन्यांच्या कालावधीत सात हजार ३१० वाहन चालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. १७ हजार १५६ वाहनांची तपासणी करण्यात आली असून, ११ हजार ७० जणांचे समुपदेशन करण्यात आले आहे.**





अति वेगामुळे गेल्या काही वर्षांपासून महामार्गावर अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. सध्या बाजारात अति वेगाने धावणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांना तरुणांची मोठी मागणी आहे. कंपनीकडून वाहनांची एक निश्चित वेग मर्यादा ठेवण्यात येत असतानाही अनेक वाहन चालक स्पीड मीटरमध्ये छेडछाड करतात. दुसरीकडे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघात कमी करण्यासाठी शासन स्तरावर विविध उपाय योजना केल्या जात आहेत. याचाच भाग म्हणून महामार्गावरील वाहनांचा वेग पाहून कारवाई करणे, लेन कटिंग, सीटबेल्ट न लावणाऱ्या वाहन चालकांवर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत कारवाई करण्यात येत आहे.

> “ द्रुतगती मार्गावर गेल्या चार महिन्यांपासून वायूवेग पथकामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. १७ हजार १५६ वाहनांची तपासणी करण्यात आली. सात हजार ३१० वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहन चालकांनी वेगाने वाहने चालवू नयेत. सीटबेल्टचा वापर करावा. लेन कटिंगचे नियम पाळावेत. वाहतुकीचे नियम पाळून वाहने चालवावीत.
>
> - अतुल आंदे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड

### अतिवेगाप्रकरणी दोन हजार 682 जणांवर कारवाई

» अतिवेगाप्रकरणी सर्वाधिक दोन हजार ६८२ जणांवर कारवाई झाली आहे. एक हजार ५५६ वाहन चालकांवर लेन कटिंग, दोन हजार १२८ वाहन चालकांवर सीट बेल्ट न लावणे, ३४७ चालकांवर चुकीच्या ठिकाणी पार्किंग करणे, वाहन चालविताना मोबाईल फोनवर बोलणाऱ्या चौघांवर कारवाई करण्यात आली आहे. फिटनेस प्रमाणपत्र नसणाऱ्या ३९, विमा नसलेल्या ५५, परमिट नसलेल्या दहा तर ३८ प्रवासी बसमध्ये सामानाची वाहतूक करत असल्याचेदेखील या तपासणीत आढळून आले. २९४ वाहन चालकांवर विविध कारणांमुळे कारवाई करण्यात आली आहे. तसेच वायुवेग पथकाने चार महिन्यांत ११ हजार ७० वाहन चालकांचे वाहतुकीचे नियम पाळावेत, रस्त्यावरील शिस्त पाळावी याबाबत समुपदेशन केले.

---

# महापारेषण कंपनीचे हिंजवडी उपकेंद्र 7 वर्षांपासून धूळखात पडून

## दोषींवर कारवाईची सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांची मागणी

।पिंपरी–चिंचवड।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापारेषण या राज्य सरकारच्या कंपनीने २०१६ मध्ये हिंजवडी येथे ८९ कोटी रुपये खर्च करून ४०० केव्ही उपकेंद्र उभे केले ज्यामध्ये १६७ एमव्हीए क्षमतेचे तीन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आले. मात्र, हे तीनही पॉवर ट्रान्सफॉर्मर गेल्या सात वर्षांत उपयोगातच न आणल्याने धूळ खात पडून आहेत. या तीनही पॉवर ट्रान्सफॉर्मरची गॅरंटी, वॉरंटी संपुष्टात आली आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी सजग नागरिक मंचने केली आहे.**



हिंजवडी उपकेंद्र गेल्या सात वर्षांपासून धूळ खात पडून असल्याची माहिती सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांना माहिती अधिकारामध्ये उपलब्ध झाली आहे. ही बाब ऊर्जा सचिव यांच्या निदर्शनास आणून देत या प्रकरणाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी वेलणकर यांनी केली आहे.

वेलणकर म्हणाले, महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडी येथील मोठमोठ्या कंपन्यांना विनाव्यत्यय वीजपुरवठा करता यावा म्हणून हे उपकेंद्र प्रचंड पैसे खर्च करून उभारण्यात आले. मात्र गेले सात वर्षे हे सबस्टेशन वापराविना पडून असल्याने कोट्यावधी रुपये पाण्यात जाण्याची भिती आहे. आता यातील दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर जेजुरी आणि कळवा येथे हलविण्याच्या हालचाली सुरू आहेत. या ट्रान्सफॉर्मरची बंद अवस्थेत असूनही नियमित देखभाल झाली असेल तर काही काळ तरी ते वापरात येऊ शकतील.

या उपकेंद्रासाठी लागणारा ४०० केव्हीचा पुरवठा उपलब्ध होण्यासाठी आजवर येथे ४०० केव्हीच्या केबल्सच टाकण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या उपकेंद्राचा वापर होऊ शकला नाही.

या ४०० केव्हीच्या केबल्स टाकणे, त्यासाठी मोठाले टॉवर्स उभारणे हे प्रचंड वेळखाऊ काम असल्याने पुढील काही वर्षे तरी हे उपकेंद्र वापरात येऊ शकणार नाही. एकीकडे वीजेची वाढती बिले भरताना सामान्य ग्राहकांची दमछाक होत आहे. तर, दुसरीकडे महापारेषण सारखी कंपनी नागरिकांच्या बिलांमधून मिळालेले कोट्यावधी रुपये पाण्यात घालते आहे हे संतापजनक आहे. अशी धूळ खात पडून असलेली आणखीही उपकेंद्रे उर्वरित महाराष्ट्रात असू शकतात. या उपकेंद्राच्या उभारणीसाठी नागरिकांच्या कष्टाचे शेकडो कोटी रुपये वायाच गेले आहेत. हिंजवडी उपकेंद्रासह उर्वरित महाराष्ट्रात अशी किती उपकेंद्रे किती काळापासून बंद अवस्थेत पडून आहेत याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. त्यासाठी पाण्यात गेलेले कोट्यावधी रुपये त्यांच्याकडून वसूल करण्यात यावेत, अशी मागणी विवेक वेलणकर यांनी केली आहे.



भाष्य

नितीन सावंत
91 9892514124

# पवारकाका सांगा कुणाचे?



**राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी उद्योगपती गौतम अडाणी यांची समर्थन केल्याने महाराष्ट्रभर खळबळ माजली आहे. देशभरातील काँग्रेस सह अठरा विरोधी पक्षाने गौतम अडाणी यांच्या विरोधात भूमिका घेऊन संसदेचे कामकाज चालू दिले नव्हते. मात्र शरद पवार हे विरोधी पक्षात असताना या आंदोलनापासून दूर होते.**

शरद पवार आणि कै. बाळासाहेब ठाकरे यांचे एक वैशिष्ट्य आहे. ते आपल्या मित्रांना वाचवण्यासाठी कोणतीही भूमिका घेण्यास तयार असतात. मात्र बाळासाहेब ठाकरे हे ही भूमिका आपल्या मित्राच्या प्रेमापोटी घेतात शरद पवार हे भूमिका स्वार्थापोटी घेतात. हाच या दोघांमधील फरक आहे.पुण्याचे उद्योगपती अविनाश भोसले आणि कै.बाळासाहेब ठाकरे यांचे घनिष्ठ संबंध होते.मुंबई विमान तळावरील एका घटनेत कस्टम अधिकाऱ्यांशी त्याचा वाद झाला होता.त्यातून पोलीस केस आणि अटक असा प्रकार घडला होता. त्यावेळी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले.एवढेच नव्हे तर आपल्या सामना मुखपत्रातून त्यांची बाजू घेतली होती.अग्रलेख ही लिहिला होता. मराठी उद्योगपती वरच अन्याय का?असा सवाल त्यांनी अग्रलेखातून केला होता.पण ते समर्थन केवळ प्रेमापोटी होते.त्यामध्ये त्यांचा तिळमात्र स्वार्थ नव्हता.

आज या प्रसंगाची आठवण झाली ती उद्योगपती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मित्र म्हणून ज्यांची प्रतिमा आहे त्या गौतम अडाणी याच्या पाठीशी शरद पवार ठामपणे उभे ठाकले आहेत.यासाठी अडाणी यांच्या मालकीच्या NDTV चॅनल वरून शरद पवारांची एक मुलाखत प्रसिद्ध झाली.या मुलाखतीत पवारांनी अडाणी यांना सरसकट दोष देऊ नका,असा सल्ला विरोधी पक्षांना दिला आहे.या प्रकरणात दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी गप्प असताना शरद पवारांनी भूमिका मांडणे याला अनेक कंगोरे आहेत.

मूळात शरद पवार यांचे राजकारण हे बेभरवशाचे असते,याची जाणीव सर्वात आधी काँग्रेसला आहे.शरद पवारांच्या राजकारणाची सुरुवात विश्वासघाताने झाली.१९७८ साली वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडून शरद पवार वयाच्या ३९ व्या वर्षी मुख्यमंत्री झाले.याचे फार मंडळींना अप्रूप आहे.त्यांच्या राजकारणात प्रामाणिकपणा कधीच नसतो.त्यामुळेच दोनवेळा काँग्रेस मधून फुटूनही त्यांचा पक्ष स्वबळावर सत्तेवर येऊ शकला नाही.त्यांच्यानंतर काँग्रेस सोडून गेलेल्या ममता बॅनर्जी पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री झाल्या.काँग्रेस ला आव्हान देत जगन मोहन रेड्डी आंध्र प्रदेश चे मुख्यमंत्री झाले.पण शरद पवारांचा पक्ष ७१ च्या पुढे जाऊ शकला नाही.

१९७८ साली काँग्रेस फोडून समाजवादी काँग्रेस स्थापन करणारे शरद पवार १९८४ साली परत काँग्रेस मध्ये आले.त्यानंतर पुन्हा १९९९ साली ते काँग्रेस फोडून बाहेर गेले. त्यावेळी तर पवारांची अशी हवा होती की सर्वाधिक जागा त्यांच्याच पक्षाला मिळणार. तत्कालीन प्रदेश अध्यक्ष प्रतापराव भोसले एकटेच गांधी भवन मध्ये असत.मात्र त्यांना ठाम विश्वास होता की काँग्रेस एक नंबर चा पक्ष असेल.त्याप्रमाणे काँग्रेस ला ७५ जागा मिळाल्या तर राष्ट्रवादी ला ५८ जागांवर समाधान मानावे लागले.पुन्हा नाक मुठीत धरून काँग्रेस सोबत आले.त्यावेळी पवारांनी काँग्रेस पक्ष सोडला नसता तर ते पंतप्रधान पदाचे प्रबळ दावेदार ठरले असते.पण त्यांच्या या धरसोड वृत्तीमुळेच त्यांचे राजकीय नुकसान झाले.काँग्रेस ला केंद्रात फटका देण्यासाठी ते फुटले होते. पण सुदैवाने तसे घडले नाही.

आतासुद्धा सर्व विरोधी पक्ष पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विरोधात एकवटले असताना यातील हवा काढण्यासाठी ते गौतम अडाणी च्या बाजूने एकटे उभे राहिले.

शरद पवार यांच्या या भूमिकेचा अडाणी यांच्यापेक्षा भाजप ला फायदा होणार आहे. या प्रश्नावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मौन असताना पवार यांना अडाणी यांचा पुळका यायचे कारण काय?असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.परंतु राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना अडाणी यांच्या सोयीचे अनेक निर्णय घेतले गेले.मुंबईतील तीन प्रकल्प मराठी उद्योगपतीच्या तोंडातून काढून याच अडाणी महाशयांना पवार साहेबांच्या कृपेने देण्यात आले.यासाठी अजित पवार आणि छगन भुजबळ यांनी विरोध केला असतानाही हा निर्णय घेण्यात आला.मुंबईतील धारावी सारखा ड्रीम प्रोजेक्ट अडाणी यांच्या घशात घालण्यात आला.गोरेगाव येथील म्हाडाची मोतीलाल नगर मधील १३० एकर वरील वसाहती अडाणी यानांच आंदण देण्यात येणार होत्या.त्याची तयारी ही झाली होती. त्यामुळे अडाणी फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मित्र ही राहुल गांधी यांची शंका खोटी आहे.आज मुंबई उपनगरातील रहिवाशी सर्वात महागडी वीज वापरत आहेत. पण अडाणी एनर्जी च्या विरोधात कोणताही राजकीय पक्ष बोलण्यास तयार नाही मध्यंतरी एका मनसे पदाधिकाऱ्याने अडाणी विरोधात मोर्चा काढण्याची घोषणा केली होती.पण राजगड वरुन आदेश येताच हा मोर्चा रद्द करण्यात आला होता.

## संपादकीय

# डॉक्टर.. तुम्हीसुद्धा?

***एकदा का श्रेय आणि श्रेय हेच राजकीय पक्षांचे उद्दिष्ट झाले की चांगल्या योजनांचा, निर्णयांचा विचका हां हां म्हणता होतो. जनतेचे भले, व्यापक हित वगैरे केवळ थोतांड.***

चर्चा- परिसंवाद साजरे करण्यापुरताच या शब्दांचा उपयोग. आपल्याकडे याची उदाहरणे मुबलक. अटलबिहारी वाजपेयी सरकारचा किराणा दुकानांत परकीय गुंतवणुकीचा निर्णय काँग्रेसजनांनी हाणून पाडला. मग काँग्रेसच्या या प्रयत्नास भाजपने सुरुंग लावला. मनमोहन सिंग सरकारच्या काळातील अशा निर्णयांची तर मोठीच यादी बनेल. 'भ्रष्टाचाराचा मेरुमणी' ठरलेली मनरेगा, 'आधार', अमेरिकेशी केलेला अणुकरार, जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर अशा किती योजना सांगाव्यात? या सर्व त्यावेळी विरोधी पक्षाची भूमिका बजावणाऱ्या भाजपने ठरवून आपटवल्या. पुढे भाजपची सत्ता आली.

# आयुष्याचा धबधबा!

**निसर्गाने आपल्याला सुंदर आयुष्य दिले आहे; मात्र क्षुल्लक कारणे आणि गैरसमजामुळे आयुष्यातील नात्यांची वीण सैल होते आणि नको ते प्रसंग आयुष्यात येतात. दुसरीकडे मात्र दिव्यांग, अनाथ मुलांना ना कधी आई-वडिलांची माया मिळाली, ना हे सुंदर जग कसे दिसते, हे पाहता आले; परंतु त्याबाबत कुठलीही तक्रार न करता मिळालेले आयुष्य चांगल्या पद्धतीने जगण्यासाठी ते वाटचाल करतात.**



दर आठवड्याला माझ्या जनसंपर्क कार्यालयात जनता दरबार असतो. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक तक्रारदार येत असतात. खूप घटना जवळून पाहता येतात, व्यक्ती अनुभवता येतात, कधीही न ऐकलेले भीषण अनुभव सोसणारी माणसं समोर पाहून आपले दुःख काहीच नाही, आपण सुखाच्या ऐरावतच आहेत, हे मत मात्र ठाम होत राहतं.

दुःखी, कष्टी, नैराश्याने ग्रासलेल्या, आत्मविश्वास गमावलेल्या आणि सर्वात वेदनादायक म्हणजे आपल्याच माणसाने पाठीवर वार केल्याने, भरून न येणाऱ्या जखमा घेऊन आयुष्याची वाटचाल काटेरी रस्त्यावरून करणारी ही माणसं... आपण आपुलकीचे दोन शब्द आणि समस्यांचा गुंता सोडवण्यासाठीचे आश्वस्त आणि विश्वासक पाठबळ दिले, तरी त्यांच्या चेहऱ्यावरचे स्मितहास्य, आपल्यालाही जगण्याचं बळ देते. परवाही अशीच प्रचंड गर्दी. गर्दीमुळे दुपारपासून थांबल्यानंतर सायंकाळी दोन कुटुंबांना आत येता आले. आजची ही केस तरी माझ्यासाठी समाधानाची होती. कारण नवरा बायकोला विनंती करायला आला होता.'मी कोणताही त्रास देणार नाही सासरी चल... सुखाने राहू, वाटलं तर तसं लेखी लिहून देतो; पण फक्त आई-वडिलांपासून वेगळं राहायचं ही अट मान्य नाही.'मी खुश होते, मला वाटलं बायको आनंदात तयार होईल, विषय समोरच मिटेल. दोन्ही कुटुंब हजर होती; पण कशाचे काय... मुलीकडच्या बाजूचे टोकाच्या भूमिकेवर होते. मुलाचे आई-वडील हात जोडून उभे होते. आम्हाला काहीच वाद घालायचा नाही. मुलाचा संसार नीट व्हावा, एवढीच अपेक्षा. हवं तर आम्ही स्वतंत्र राहतो; पण त्या दोघांनी एकत्र राहावं, असं लहान लेकराला घेऊन किती दिवस माहेरी राहणार? पण मुलगी आणि तिच्या घरचे क्षणभरही सामंजस्याने मिटून घेईनात. 'आम्हाला मुलगी मुलासोबत स्वतंत्र राहायला हवी, तरच आम्ही मुलगी पाठवू आणि तसं आम्हाला लिहून द्या.''आपण ज्या घरात मुलगी दिली, तेव्हा मुलाचे आई-वडील, त्यांचे घर, नातेवाईक, भाऊ-बहिणी, हे सगळं पाहूनच मुलगी दिली ना... मग आता आई-वडील घरात नको म्हणणारे उद्या तुमची स्वतःची सून घरात आल्यावर घराबाहेर पडणार का? आणि हे कोणते संस्कार? कोणती कुटुंब व्यवस्था?' मी रागात बोलते हे पाहून मुलीचे कुटुंब जरा शांत झाले, मुलीला विचारले, तुला सासरी जायचे का नाही ते सांग?

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबादारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाविकास आघाडीतील खदखद चव्हाट्यावर?

## उद्धव ठाकरे शरद पवारांच्या भेटीसाठी गेल्यामुळे चर्चांना उधाण

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये मतभेद असल्याचं समोर आलं आहे. अलीकडेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी भारतीय उद्योजक गौतम अदाणी यांचं एकप्रकारे समर्थन केलं होतं. हिंडेनबर्ग अहवालातून अदाणींना लक्ष्य केल्याचं दिसत आहे, असं विधान शरद पवारांनी केलं. शरद पवारांच्या या विधानानंतर महाविकास आघाडीमध्ये काहीतरी धुसफूस सुरू असल्याचं समोर आलं.**

काँग्रेस आणि ठाकरे गटाने अदाणी प्रकरणी आक्रमक भूमिका घेत जेपीसी चौकशीची मागणी केली होती. पण शरद पवारांनी जेपीसी चौकशीची गरज नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या समितीकडून चौकशी झाली तर योग्य राहिल, असं विधान शरद पवारांनी केलं. एवढेच नव्हे तर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्यास घाई केली. राजीनामा देण्यापूर्वी त्यांनी महाविकास आघाडीतील इतर नेत्यांशी चर्चा केली नाही, असं विधान केलं. त्यामुळे महाविकास आघाडीत सर्वकाही आलबेल नाही, हे पुन्हा एकदा अधोरेखित झालं. महाविकास आघाडीमध्ये खदखद सुरू असल्याच्या बातम्याही समोर आल्या.

या सर्व घडामोडीनंतर महाविकास आघाडीतील दोन मोठ्या नेत्यांची भेट होत आहे. उद्धव ठाकरे हे शरद पवारांच्या निवासस्थानी 'सिल्व्हर ओक'वर रवाना झाले आहेत. शरद पवारांच्या निवासस्थानी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊतही उपस्थित असल्याची माहिती मिळत आहे. या दोन नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा होणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.



## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तत्काळ मदत जाहीर करा

### अजित पवारांचं मुख्यमंत्र्यांना पत्र



।मुंबई ।।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

मार्च आणि एप्रिल महिन्यात राज्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या पिकांसाठी हेक्टरी ५० हजार रुपये आणि फळबागांसाठी हेक्टरी एक लाख रुपयांची मदत तातडीने जाहीर करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली. याबाबतचं एक पत्र त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

या पत्रात मार्च व एप्रिल महिन्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे पशुधनाच्या आणि घरांच्या नुकसानीसाठी एनडीआरएफच्या निकषाच्या दुप्पट मदत जाहीर करावी. वीज पडून मृत्यूमुखी पडलेल्यांच्या आणि पारस येथील दुर्दैवी घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना एनडीआरएफमधून ४ लाख आणि मुख्यमंत्री मदत निधीतून ६ लाख रुपयांची मदत करावी. निर्यातक्षम द्राक्ष बागायतदार तसेच बेदाणा प्रक्रिया उद्योगांना भरीव मदत करावी, अशी मागणी अजित पवारांनी पत्राद्वारे केली.मागील खरीपात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी एनडीआरएफ निकषाच्या दुप्पट मदत जाहीर करण्यात आली होती. पण २७ मार्च २०२३ च्या नवीन आदेशामुळे दुप्पट मदतीचा निर्णय बदलून एनडीआरएफच्या जुन्या निकषात थोडीफार वाढ केली आहे. या नवीन आदेशाचा फेरविचार करुन एनडीआरएफच्या निकषाच्या दुप्पट मदतीबाबतचा निर्णय सरकारने घ्यावा. सततचा पाऊस नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित करण्याच्या सरकारच्या निर्णयाचे स्वागत आहे.

## राज्यातील तीन मोठे प्रकल्प लागणार मार्गी

### जालना-नांदेड महामार्ग आणि पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्पासाठी स्वारस्य निविदा

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



**गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विरार – अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेसह जालना – नांदेड समृद्धी मार्ग (विस्तारीत मार्ग) आणि पुणे वर्तुळाकार रस्ता प्रकल्प लवकरच मार्गी लागण्याची चिन्हे आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या तिन्ही महत्त्वाकांक्षी आणि मोठ्या प्रकल्पांच्या बांधकामासाठी मंगळवारी स्वारस्य निविदा जारी केल्या आहेत. तिन्ही प्रकल्पांची कामे टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून समृद्धी महामार्गाप्रमाणे प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे.**

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी, तसेच विरार – अलिबाग अंतर कमी करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) विरार – अलिबागदरम्यान १२८ किमी लांबीची बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका बांधण्याचा निर्णय घेतला होता. मात्र एमएमआरडीएला हा प्रकल्प मार्गी लावता न आल्याने तो एमएसआरडीसीला हस्तांतरीत करण्यात आला. त्यानुसार आता १२८ किमीपैकी ९६.४१ किमी लांबीच्या मार्गिकेच्या बांधकामासाठी स्वारस्य निविदा जारी करण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यातील ९६.४१ किमी लांबीच्या मार्गिकेचे बांधकाम ११ टप्प्यात करण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात येणार आहे.मुंबई – नागपूर अशा ७०१ किमी लांबीच्या समृद्धी महामार्गाचा विस्तार जालना – नांदेडपर्यंत करण्यात येणार आहे. यासाठी एमएसआरडीसीने १९० किलोमीटर लांबीचा जालना – नांदेड महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. आता या प्रकल्पाच्या कामासाठी स्वारस्य निविदा जारी करण्यात आल्या आहेत. पाच टप्प्यात या महामार्गाचे काम करण्यासाठी स्वारस्य निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्याच वेळी पुण्यातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी पुणे रिंग रोड अर्थात पुणे वर्तुळाकार रस्ता बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार १३६ किमी लांबीच्या रस्त्याच्या बांधकामासाठी एमएसआरडीसीने स्वारस्य निविदा जारी केल्या आहेत. एकूण नऊ टप्प्यांमध्ये हे काम करण्यात येणार आहे. नऊ टप्प्यांसाठी स्वतंत्र निविदा मागविण्यात आल्या आहेत. एमएसआरडीसीने तीन प्रकल्पांच्या कामासाठी एकूण २६ टप्प्यांमध्ये एकत्रित स्वारस्य निविदा जारी केली.

### पुढील वर्षी कामास सुरुवात

**पुढील तीन महिन्यांत स्वारस्य निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर अंतिम निविदा मागविण्यात येतील. ही संपूर्ण निविदा प्रक्रिया पूर्ण करून बांधकामाचे कार्यादेश जारी करण्यासाठी किमान वर्षभराचा कालावधी अपेक्षित आहे. या तिन्ही प्रकल्पांच्या प्रत्यक्ष कामाला २०२४ मध्ये सुरुवात करण्याचे नियोजन आहे. दरम्यान, या तिन्ही प्रकल्पांसाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे. भूसंपादन पूर्ण झाल्यानंतरच कंत्राटदारांना कार्यादेश देण्यात येणार आहेत, असे एमएसआरडीसी, सहव्यवस्थापकीय संचालक, अनिलकुमार गायकवाड म्हणाले.**

# कर्नाटक निवडणुकीपूर्वी भाजपला मोठा झटका!

## माजी मुख्यमंत्री बंडखोरीच्या तयारीत



। कर्नाटक महाईन्यूज ।

**कर्नाटकचा गड जिंकण्याच्या तयारीत असलेल्या भाजपला निवडणुकीपूर्वी मोठा झटका बसण्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीला महिनाभरापेक्षा कमी कालावधी असताना पक्षात मोठी बंडखोरी होण्याची शक्यता आहे.सहा वेळा भाजपचे आमदार आणि माजी मुख्यमंत्री जगदीश शेट्टर हे पक्षावर नाराज आहेत.**

### जगदीश शेट्टर राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात

**» कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते जगदीश शेट्टर हे राज्याच्या विधानसभा निवडणुकीत निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे दिसत आहे. त्यांना भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी न लढण्यासा सांगितले होते. मात्र शेट्टर यांना पक्षाचा निर्णय मान्य नाही. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांना १० मे रोजी होणारी विधानसभा निवडणूक लढवू नये असे सांगितले आहे. त्यावर त्यांनी या निर्णयावर नाराजी असल्याचे पक्षातील प्रमुख नेत्यांना सांगितले आहे.**

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि भाजप नेते जगदीश शेट्टर हे राज्याच्या विधानसभा निवडणुकीत निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे दिसत आहे. त्यांना भाजपच्या केंद्रीय नेत्यांनी न लढण्यासा सांगितले होते. मात्र शेट्टर यांना पक्षाचा निर्णय मान्य नाही. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने त्यांना १० मे रोजी होणारी विधानसभा निवडणूक लढवू नये असे सांगितले आहे. त्यावर त्यांनी या निर्णयावर नाराजी असल्याचे पक्षातील प्रमुख नेत्यांना सांगितले आहे.

जगदीश शेट्टर हे हुबळीचे आमदार आहेत.त्यांनी यापूर्वी सहा वेळा विधानसभा निवडणुकीत विजय मिळवला आहे. २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत शेट्टर २१ हजार मतांच्या फरकाने विजयी झाले होते.त्यानंतर त्यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे महेश नलवाड यांचा पराभव केला होता.आमदार शेट्टर म्हणाले, "सर्वेक्षणातही माझी लोकप्रियता चांगली आहे. मी एकही निवडणूक हरलो नाही. मला तिकिट नाकारण्याचे कारण नाही, त्यामुळे मी पक्षप्रमुखांना विनंती केली आहे. मला निवडणूक लढवण्याची संधी द्या."

"मी पुन्हा निवडणूक लढविणार असल्याचे नेतृत्वाला सांगितले असून मला संधी देण्याची विनंती केली आहे. पक्षाचा निर्णय आपल्याला मान्य नसल्याचं मी नेतृत्वाला कळवले आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यावर फेरविचार करावा" असं आवाहन देखील शेट्टर यांनी केलं आहे.

विशेष म्हणजे गुजरातच्या धर्तीवर कर्नाटक निवडणुकीतही भाजपला नव्या चेहऱ्यांना संधी द्यायची आहे. मात्र यामुळे पक्षाच बंडखोरीची शक्यता देखली आहे.

# भाजपची उमेदवारी यादी पुन्हा लांबणीवर

## सलग चार दिवस बैठकांचे सत्र

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नवी दिल्ली : कर्नाटकमधील भाजपच्या उमेदवारांच्या निवडीसाठी दिल्लीत सलग चार दिवस बैठकांचे सत्र सुरू असून सोमवारीदेखील अनिश्चितता कायम होती. उमेदवारांची पहिली यादी सोमवारी जाहीर होणे अपेक्षित होते, मात्र त्यासाठी आता मंगळवार किंवा बुधवार उजाडेल, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी सांगितले.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत केंद्रीय निवड समितीच्या तीन तासांच्या बैठकीत सर्व उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब न झाल्याने सोमवारी सकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निवासस्थानी वरिष्ठ नेत्यांची चर्चा झाली. शहा अरुणाचल प्रदेशच्या दौऱ्यावर निघून गेल्यानंतर पक्षाध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या निवासस्थानी चर्चेची दुसरी फेरी झाली. तरीही संभाव्य उमेदवारांबाबत नेत्यांच्या मनात किंतू राहिल्याने पुन्हा चर्चा होऊन कदाचित मंगळवारी उमेदवारांची पहिली यादी जाहीर होऊ शकेल. 'काही उमेदवारांबाबत मतदारसंघातून अधिक माहिती मागितली असून त्या आधारावर त्यांचे पुन्हा मूल्यमापन केले जाईल आणि नव्या उमेदवारांवर चर्चा करावी लागेल,' असे बोम्मई यांनी पत्रकारांना सांगितले.प्रत्येक मतदारसंघात तीन उमेदवारांच्या पर्यायांची यादी प्रदेश भाजपच्या नेत्यांनी केंद्रीय नेतृत्वाकडे दिली होती. त्यावर पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीआधी सलग दोन दिवस पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी झालेल्या चर्चामध्ये बराच खल झालेला होता. त्यानंतर मोदींसमोर उमेदवार निश्चितीसाठी फायदा-तोट्याचे गणित मांडले गेले. या बैठकांमध्ये बोम्मई, येडियुरप्पा, अमित शहा, जे. पी. नड्डा, निवडणूक प्रभारी धर्मेंद्र प्रधान, सहप्रभारी मनसुख मांडाविया, प्रभारी अरुण सिंह, बी. एल. संतोष, सी. टी. रवी, प्रल्हाद जोशी, प्रदेशाध्यक्ष नलीनकुमार कातील तसेच अन्य प्रदेश भाजपचे नेते उपस्थित होते.

**बंडखोरीची भीती?**

भाजपच्या मुख्यालयात झालेल्या केंद्रीय निवड समितीच्या बैठकीत १७०-१८० उमेदवार निश्चित केले असले तरी, मोदी-शहांनी काही उमेदवारांच्या निवडीबाबत शहानिशा करण्याची सूचना केल्यामुळे नड्डांना आवश्यक माहिती दिली जात असल्याचे माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा यांनी सांगितले. काँग्रेस व जनता दल (धर्मनिरपेक्ष) या पक्षांतून भाजपमध्ये आलेल्या आमदारांना पुन्हा उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपमध्ये नाराजी वाढू शकते. एक तृतियांश आमदारांना डच्चू देण्याचा गुजरात फॉम्र्युला न वापरता शक्य त्या मतदारसंघांमध्ये विद्यमान आमदारांना पुन्हा संधी दिली जाणार आहे.



### बोम्मई पारंपरिक शिगावमधून

**» कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई हे पारंपरिक शिगाव मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत. २००८ पासून तीनवेळा या मतदारसंघातून बोम्मई विधानसभेचे सदस्य बनले आहेत. माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांची मागणीही मान्य झाल्याचे सांगितले जाते. येडियुरप्पा यांचे पुत्र विजयेंद्र यांना शिकारीपुरा मतदारसंघातून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार सिद्धरामय्या यांच्या विरोधात वरुणा मतदारसंघातून विजयेंद्र यांना उमेदवारी देण्याचा विचार केंद्रीय नेतृत्वाने केला होता. मात्र, येडियुरप्पा यांनी हा विचार हाणून पाडला असून आपल्या बालेकिल्ल्यातून विजयेंद्र यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यावर येडियुरप्पा ठाम राहिल्याचे दिसते.**

# ५ तासात संपले सचिन पायलट यांचे उपोषण!

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी नुकतंच आपलं उपोषण मागे घेतलं आहे. पायलट यांनी प्रसाद खाऊन आपलं उपोषण सोडलं. अवघ्या पाच तासांत हे उपोषण संपल्याने हा स्टंट आहे की बंड, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

माध्यमांशी बोलताना सचिन पायलट म्हणाले, "भ्रष्टाचाराप्रकरणी चौकशीची मागणी आम्ही केली आहे. भ्रष्टाचाराबद्दल खुलासा करण्याच्या समर्थनार्थ मी आज उपोषण केलं आहे. आशा करतो की भ्रष्टाचाराप्रकरणी कारवाई होईल." माझ्या मागण्यांवर कारवाई होईल, अशी आशा करत

### राजकीय स्टंट की बंड?

सचिन पायलट यांनी उपोषण सोडलं आणि तिथून निघाले.

सचिन पायलट यांनी आज जयपूर इथल्या शहीद स्मारकाजवळ सकाळी ११ वाजता आपल्या सहकाऱ्यांसोबत उपोषणाला सुरुवात केली. पावणे चारच्या आसपास हे उपोषण संपलं. भ्रष्टाचाराच्या विरोधात कारवाईच्या मागणीसाठी मी हे उपोषण केलं होतं. जर संघटनेबद्दल काही असतं, तर मी संघटनेशी बोलणी केली असती. मी वर्षभरापासून मुख्यमंत्र्यांकडे या प्रकरणी मागणी करत होतो, असंही पायलट म्हणाले.



## लग्नानंतर 9 महिन्यांनी मराठी अभिनेत्री पुन्हा मालिकेत, पहिल्यांदाच साकारणार ही भुमिका

लग्नानंतर अनेक मराठी अभिनेत्री अभिनय क्षेत्रातुन ब्रेक घेतात. पण अशा काही अभिनेत्री आहेत ज्या लग्न झाल्यावर लगोलग पुन्हा एकदा अभिनय क्षेत्रात सक्रीय होतात. अशीच एक अभिनेत्री लग्नानंतर पुन्हा एकदा मराठी मालिकेत कमबॅक करतेय. ती म्हणजे रूपल नंद.

नेहमी निरनिराळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारी अभिनेत्री रूपल नंद आता एका नव्या भूमिकेतून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाली आहे. ‘कारण गुन्ह्याला माफी नाही’ या नव्या मालिकेतून रूपल नंद प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच मालिकेचा नवीन प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. त्यात रूपलची नवी व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.



यापूर्वी निरनिराळ्या मालिकांमधून विशेष व्यक्तिरेखा साकारून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी रूपल नेहमीच मग्न असते. आता ती एका नव्या रूपात नव्या मालिकेतून प्रेक्षकांचे मनोरंजन करताना आपल्याला दिसणार आहे. मोहिनी दुभाषी असे तिच्या व्यक्तिरेखेचे नाव असणार आहे.पोलीस आपल्या कामात नेहमी तत्पर असतात. दिवस-रात्र आपल्या कामाला महत्त्व देतात. आपल्या कुटुंबासाठी द्यायला पुरेसा वेळ त्यांच्याकडे नसतो.आपल्या कामाला नेहमी प्राधान्य देतात. अशाच प्रकारची विशिष्ट व्यक्तिरेखा या मालिकेतून आपल्याला पुन्हा भेटणार आहे, ती म्हणजे इन्स्पेक्टर भोसले. आपल्या कामात नेहमी तत्पर असणारे इन्स्पेक्टर विजय भोसले यांच्या आयुष्यातील दुसरी बाजू, ‘कारण गुन्ह्याला माफी नाही’! मालिकेतून उलगडणार आहे.

याव्यतिरिक्त अश्विनी कासारही या मालिकेतून पोलीस निरीक्षकाच्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

## सुश्मिता सेनला शूटिंग करताना सेटवरच आला होता हृदयविकाराचा झटका

बॉलिवूड अभिनेत्री सुश्मिता सेनला गेल्याच महिन्यात हृदयविकाराचा झटका आला होता. अभिनेत्रीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत ही माहिती चाहत्यांना दिली होती. हृदयविकाराचा झटका आल्यानंतर ॲंजिओप्लास्टीही करण्यात आल्याचं सुश्मिताने सांगितलं होतं. यातून बरे होत असल्याचं सुश्मिता म्हणाली होती. याबाबत आता सुश्मिताचा सहकलाकार विकास कुमारने खुलासा केला आहे.

विकासने नुकतीच ‘नेटवर्क १८’ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्याने ‘आर्या ३’च्या शूटिंगदरम्यानच सेटवर सुश्मिताला हृदयविकाराचा झटका आल्याचं म्हटलं आहे. विकास म्हणाला, “आम्ही जोधपूरमध्ये ‘आर्या ३’ वेब सीरिजमधील काही ॲक्शन सीन्सचं शूटिंग करत होतो. याचदरम्यान सुश्मिताला हृदयविकाराचा झटका आला होता. सेटवर शूटिंगदरम्यान सुश्मिताची प्रकृती बिघडली होती. त्यानंतर काही मेडिकल टेस्ट करण्यात आल्या. तेव्हा सुश्मिताला हृदयविकाराचा झटका आल्याचं समजलं.”सुश्मिताला हृदयविकाराचा झटका आल्याचं टीममधील कोणालाच माहीत नव्हतं. तिला स्वत:लाही याबाबत काहीही माहिती नव्हती. मेडिकल टेस्टच्या रिपोर्टनंतर सुश्मिताला याबाबत कळलं. पण तिने हृदयविकाराचा झटका आल्याचं कोणालाही सांगितलं नव्हतं. सुश्मिताच्या पोस्टमधूनच तिला हृदयविकाराचा झटका आल्याचं आम्हाला समजलं. सुश्मिताला याबाबत कोणत्याही प्रकारचा ड्रामा करायचा नव्हता, म्हणून तिने कोणालाही सांगितलं नाही,”



असंही पुढे विकास म्हणाला. ‘आर्या’ ही सुश्मिताची गाजलेली वेब सीरिज आहे. या वेब सीरिजचे दोन सीझन प्रदर्शित झाले असून तिसऱ्या सीझनचं शूटिंग सुरू आहे. सुश्मिता सेन ‘आर्या’मध्ये मुख्य भूमिकेत आहे. तर अभिनेता विकास कुमार या वेब सीरिजमध्ये एसीपी युनूस खानची भूमिका साकारत आहे.

## मिनी फ्रॉक घातल्यामुळे दिशा झाली ट्रोल

बॉलीवूड अभिनेत्री दिशा पटानी तिच्या ग्लॅमरस लुक आणि फिटनेसमुळेच तिच्या चाहत्यांमध्ये लोकप्रिय नाही, तर चाहते तिच्या ड्रेसिंग सेन्सबद्दलही खूप उत्सुक असतात. पण यावेळी दिशाच्या ड्रेसमुळे ती ट्रोल झाली. खरं तर, दिशा लंच डेटमध्ये स्पॉट झाली होती जिथे तिने शॉर्ट ड्रेस परिधान केला होता. त्यामुळे चाहत्यांनी तिला प्रचंड ट्रोल केले.

दिशा तिच्या बोल्ड आणि ग्लॅमरस लूकमुळे लाखो चाहत्यांना आवडत असली तरी यावेळी तिला ट्रोलचा सामना करावा लागला आहे. अलीकडेच दिशा सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या फोटो आणि व्हिडिओंमध्ये फ्लोरल मिनी फ्रॉकमध्ये दिसत आहे.



हा व्हिडिओ इन्स्टा बॉलीवूडने आपल्या इंस्टाग्रामवर शेअर केला आहे. ज्यामध्ये ती खुल्या केसांमध्ये आणि लाइट मेकअपमध्ये खूप सुंदर दिसत आहे. अभिनेत्रीचा हा लूक काही चाहत्यांना आवडला तर काही चाहत्यांनी तिला या कपड्यांवरून टार्गेटही केलं.

या फोटोंबाबत अनेक चाहत्यांनी दिशाला प्रचंड ट्रोल केले. यासोबतच चाहते सोशल मीडियावर विचित्र कमेंट्स करत आहेत. एका यूजरने लिहिले की, 'तिचे कपडे रोज छोटे छोटे होत चालले आहेत' तर दुसऱ्याने दिशाच्या 'हिरोपंती' चित्रपटातील डायलॉग लिहून तिला ट्रोल केले. यूजरने लिहिले, 'छोटी बच्ची हो क्या...' तर काही यूजर्सने दिशाची तुलना उर्फी जावेदच्या ड्रेसिंग स्टाइलशी केली. एका यूजरने लिहिले की, 'उर्फीची बहिण बर्फी...'

## हातात हिरवा चुडा, केसांत गजरा, कपाळी टिकली अन्...; सई ताम्हणकर

मराठीमधील टॉपची अभिनेत्री म्हणजे सई ताम्हणकर. सईने तिच्या अभिनय कौशल्याच्या जोरावर स्वतःला कलाक्षेत्रामध्ये सिद्ध केलं. ती मराठी चित्रपटसृष्टीपुरताच मर्यादित राहिली नाही. तर बॉलिवूड चित्रपटांमध्येही सई महत्त्वपूर्ण भूमिका साकारताना दिसते. सई तिच्या कामाबरोबरच फॅशन सेन्समुळेही चर्चेत राहिली आहे. फॅशनबाबत वेगवेगळे प्रयोग करणं तिला आवडतं. आता तिने शेअर केलेल्या फोटोंची जोरदार चर्चा रंगताना दिसत आहे.सई सोशल मीडियावर बरीच सक्रिय असते. वेस्टर्न असो वा पारंपरिक स्टाइलचे कपडे परिधान करुन ती सोशल मीडिया अकाऊंटद्वारे फोटो शेअर करताना दिसते. आताही तिने असेच काही फोटो पोस्ट केले आहेत. सईचे हे फोटो



सई वेस्टर्नबरोबरच पारंपरिक लूकमध्येही अगदी उठून दिसते. आताही तिने पारंपरिक लकूमध्ये खास फोटोशूट केलं आहे. या फोटोंमध्ये तिने साडी परिधान केलेली दिसत आहे. शिवाय तिचा साजशृंगार विशेष लक्ष वेधून घेणारा आहे. हातात हिरवा चुडा, केसात गजरा, कपाळी टिकली आणि सुंदर साडी असा सईचा लूक आहे.सईला या लूकमध्ये पाहून चाहतेही थक्क झाले आहेत. सईने हा फोटो शेअर करत म्हटलं की, “सालस”. अप्रतिम सौंदर्य, तू साडीमध्ये अगदी सुंदर दिसते, सई खूप छान, सुंदर, तू पारंपरिक लकूमध्ये लक्ष वेधून घेतेस अशा विविध कमेंट चाहत्यांनी केल्या आहेत. तर सईने या साडीवर परिधान केलेले दागिनेही अगदी सुंदर आहेत.

# दिल्लीची झोळी रिकामीच!

## रोहित शर्माच्या तुफानी अर्धशतकाच्या जोरावर मुंबई इंडियन्सचा सहा गडी राखून विजय

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२३च्या १६व्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स हे संघ आमनेसामने आले होते. आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात असलेल्या या दोन्ही संघातील सामना चांगलाच रंगला. मुंबई इंडियन्सने दिल्लीला त्यांच्यात घरात सहा गडी राखून पराभूत करत रोमांचक विजय मिळवला. प्रथम फलंदाजीची संधी मिळाल्यानंतर दिल्लीने सर्वबाद १७२ धावा केल्या. जेसन बेहरेनडॉर्फच्या षटकात मुंबईने चार बळी टिपत सामन्यात आपली बाजू भक्कम केली. कर्णधार रोहित शर्माला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

धावांचा पाठलाग करताना मुंबईने आक्रमक सुरुवात केली. पॉवर प्ले मध्ये मुंबईने दमदार सुरुवात केली असून कर्णधार रोहित आणि सलामीवीर इशान यांच्यात अवघ्या २६ चेंडूत ५० धावांची भागीदारी केली होती. दोघांनी मिळून पहिल्या १० षटकात ७१ धावा करत भक्कम अशी सलामी त्या दोघांनी दिली. त्यानंतर रोहित शर्मा आणि ईशान किशन चांगल्या टचमध्ये दिसत होते. दोघांमध्ये ७१ धावांची भक्कम अर्धशतकी भागीदारी झाली. चुकीचा कॉल करत रोहित शर्माने इशान किशनला धावबाद केले.विजयाच्या उंबरठ्यावर असताना मुंबईला



दुसरा धक्का बसला. तिलक वर्मा मोठा फटका मारण्याच्या नादात तो २९ चेंडूत ४१ धावा करत मनीष पांडेकरवी झेलबाद झाला. त्यापाठोपाठ फॉर्म मध्ये नसलेला सूर्यकुमार यादव पहिल्याच चेंडूवर मोठा फटका मारत भोपळाही न फोडता बाद झाला. दोघांना एकाच षटकात मुकेश शर्माने बाद करून सामना रोमांचक केला. दोन षटकात दिल्लीने भेदक गोलंदाजी करत मुंबईला तीन धक्के दिले. कर्णधार रोहित शर्मा जो एकमेव फलंदाज होता जो सध्या सेट होता. त्याच्या बाद होण्याने सामना रोमांचक झाला. रोहितने ४५ चेंडूत ६५ धावा केल्या. शेवटच्या षटकात इम्पॅक्ट प्लेअर टीम डेव्हिडने मॅच जिंकून दिली.

तत्पूर्वी, डेव्हिड वॉर्नरने पुन्हा एकदा ५१ धावांची उपयुक्त खेळी केली आणि यावेळेस त्याला उपकर्णधार अक्षर पटेलची चांगली साथ मिळाली. दोघांनी सहाव्या विकेटसाठी ३५ चेंडूत ६७ धावांची भागीदारी केली. मुंबई इंडियन्सचा फिरकीपटू पीयुष चावलाने सुरुवातीला दिल्लीला ३ धक्के दिले होते, परंतु मधल्या षटकांत दिल्लीने अप्रतिम फलंदाजी करत सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. अक्षरने २५ चेंडूंत ५४ धावा केल्या, त्यात त्याने ४ चौकार आणि ५ षटकारांचा साज चढवला.

जेसन बेहरेनडॉर्फने १९व्या षटकात मुंबईला चार विकेट्स मिळवून देताना लक्ष्य थोडे मुंबईच्या आवाक्यात आणले. १८ व्या षटकात ५ बाद १६५ धावा असणारा दिल्लीचा संघ पुढील १० चेंडूंत ७ धावा करून माघारी परतला. मुंबईकडून जेसन बेहरेनडॉर्फ आणि पियुष चावलाने प्रत्येकी ३ विकेट्स तर रिले मेरेडिथने २ आणि ऋतिक शौकीनने एक विकेट त्यांना साथ दिली. दिल्लीला आता आयपीएलमध्ये टिकून राहायचे असेल तर किमान पुढील सर्व सामने जिंकणे आवश्यक आहे.

# RCB चा पराभव झाला...पण कोहलीने 'हा' विराट पराक्रम करत मैदानात रचला इतिहास

## सोशल मीडियावर विराटची चर्चा रंगली आहे

। गुवाहाटी ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताचा माजी कर्णधार विराट कोहली इंडियन प्रीमियरल लीग २०२३ मध्ये आक्रमक फलंदाजी करताना दिसत आहे. सोमवारी लखनऊ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात अटीतटीचा सामना झाला. विजयासाठी शेवटच्या चेंडूवर एका धावेची गरज असताना लखनऊने बाजी मारली आणि सामना खिशात घातला. परंतु, सोशल मीडियावर विराटची चर्चा रंगली आहे. कारण अप्रतिम फलंदाजी करत ४४ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकार ठोकून विराटने ६१ धावांची अर्धशतकी खेळी केली.



या वादळी अर्धशतकासोबतच विराटने आयपीएलच्या इतिहासात आतापर्यंत राहिलेल्या अनेक संघांना मिळून त्यांच्याविरोधात पन्नासवा अर्धशतक केला. यामध्ये पुणे वॉरियर्स आणि डेक्कन चार्जर्स संघांचाही समावेश आहे. तसंच या इनिंगसोबत कोहलीने टूर्नामेंटमध्ये सध्याच्या घडीला खेळणाऱ्या इतर ९ संघांविरुद्ध बेस्ट स्कोअर केला आहे.

### टीम स्कोर

- सीएसके 90*
- डीसी 99
- जीटी 73
- केकेआर 100
- एमआय 92*
- पीबीकेएस 113*
- आरआर 72*
- एसआरएच 93*
- एलएसजी 61

तर जाणून घेऊयात आयपीएलमध्ये खेळणाऱ्या इतर नऊ संघांविरुद्ध कोहलीने केलेल्या बेस्ट स्कोअरबाबत.

९ पैकी ७ संघांविरुद्ध विराटने शतकी खेळीही केली आहे. अशा परिस्थितीत कोलहीच्या समोर इतर सात संघांविरुद्ध शतक करणं अजूनही आव्हानात्मक आहे. परंतु, ज्या प्रकारे विराटचा फॉर्म सुरु आहे, ते पाहता कोहली काही सीजनमध्ये मागील स्कोरप्रमाणे शतक ठोकण्याची शक्यता आहे.

# करिअरची उलटी गिनती सुरू!

## कसोटी संघानंतर IPL मधूनही मिळणार डच्चू?

। कोलकाता । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताच्या कसोटी संघानंतर अनुभवी फलंदाजालाही आयपीएलमधून वगळण्याचे मानले जात आहे. आयपीएल 2023 मध्ये हा अनुभवी भारतीय फलंदाज सतत अपयशी ठरत आहे, त्यानंतर त्याची कारकीर्द लवकरच संपुष्टात येऊ शकते. भारतीय कसोटी संघातून वगळल्यानंतर आता या खेळाडूची आयपीएल कारकीर्दही जवळपास संपल्याचे दिसत आहे.

लखनौ सुपर जायंट्सचा कर्णधार केएल राहुल आयपीएल 2023 मध्ये सतत फ्लॉप होत आहे. केएल राहुलला आयपीएल 2023 च्या मोसमात आतापर्यंत केवळ 8, 20, 35 आणि 18 धावा करता आल्या आहेत. केएल राहुल अतिशय खराब फॉर्ममध्ये धावत आहे. निवडकर्त्यांनी केएल राहुलचा भारतीय कसोटी संघातून पत्ता आधीच कट केला आहे. आता तो आयपीएलमधून कायमचा बाहेर जाऊ शकतो.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटनंतर आता आयपीएल 2023 मध्येही केएल राहुलची बॅट शांत आहे. केएल राहुलची खराब फलंदाजी लखनौ सुपर जायंट्ससाठी चिंतेचा विषय आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात केएल राहुल 20 चेंडूत 18 धावा करून बाद झाला.

